www.janatabankpune.com


# गरुड झेप

सहकार्यम् यशोधनम्

स्थापना – १९४९

सन २०१५ – अंक ४ था (जनता सहकारी बँक लि., पुणे द्वारा प्रकाशित गृहपत्रिका : केवळ खाजगी वितरणासाठी)

## अध्यक्षांचे लेखणीतून,



आपण संवाद साधताना अनेक वेळा म्हणींचा वापर करीत असतो. म्हणी या अनुभव व व्यावहारिक ज्ञानाचे भांडार असतात. कमीत कमी शब्दांत जास्तीत जास्त अर्थ व लालित्यपूर्ण शब्दरचना हे म्हणींचे भाषावैशिष्ट्य असते. अशीच एक म्हण मला वारंवार उद्धृत कराविशी वाटते. ही म्हण म्हणजे 'पुढच्यास ठेच, मागचा शहाणा'. आपण बँकेत काम करतो. हे काम कसे करायचे, काय करायचे याचे कायदे, नियम, सूचना, मार्गदर्शक तत्त्वे सर्व काही उपलब्ध असते.

आपल्या बँकेची मुख्य कचेरी, रिझर्व्ह बँक, सरकारची विविध खाती, इंडियन बँक्स असोसिएशन यांच्या द्वारे विविध परिपत्रके पाठविली जातात. प्रशिक्षण विभागातर्फे प्रशिक्षण दिले जाते. बाहेरच्या संस्थांमध्ये प्रशिक्षणासाठी आपण आपले सेवक पाठवीत असतो. या सर्वांचा उद्देश कामात सुसूत्रता असावी. एकमार्गी पद्धती असाव्यात हा असतो.

पूर्वी आपण आपल्या बँकेचे प्रोसिजर बुक तयार केले होते. कालानुरूप त्यात बदल करून प्रोसिजर बुक नव्याने प्रसिद्ध करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. हे सर्व असताना आपल्या ऑडीट विभागाच्या अहवालात रिझर्व्ह बँक व चार्टर्ड अकौंटंट फर्म द्वारे झालेल्या लेखापरीक्षणात काही प्रकारचे दोष, कमतरता, त्रुटी दरवर्षी दिसतात, अनेक शाखांत दिसतात. पुन:पुन्हा दिसतात. काही प्रकारच्या त्रुटी या आर्थिक नुकसानीकडे नेणाऱ्या असतात. 'काम करतो म्हणून चूक होते' हे वाक्य सांगायला आकर्षक वाटले तरी चुकांवर पांघरूण घालणारे व घातक आहे. घातक अशासाठी की काम बिनचूक करता येऊ शकते या विचारापासून दूर नेणारे आहे. जसा आपण झीरो एनपीएचा टप्पा समोर ठेवलेला आहे तशाच प्रकारे निल ऑडिट रिपोर्ट किंवा ऑल कम्प्लाईड ऑडिट रिपोर्ट हे उद्दिष्ट पण ठेवायला हवे. एनपीए न होण्यासाठी सतत जागरूक राहावे लागते. तसेच कामात त्रुटी न राहण्यासाठीसुद्धा सतत जागरूक राहावे लागते.

गुणवत्ता सुधारण्यासाठी जो विचार केला जातो त्याबाबत एक वाक्य प्रसिद्ध आहे. 'परफेक्शन इज अवर गोल एक्सलन्स विल बी टॉलरेटेड' केलेले काम हे परफेक्ट असावे, गुणवत्ता एक्सलंटपेक्षा कमी चालणार नाही. हा विचार आपण कृतीत आणण्यासाठी आटोकाट प्रयत्न करणे आवश्यक आहे. वारंवार त्याच कमतरता, त्याच त्रुटी यातून आपण बाहेर पडायला हवे. सर्वसामान्यपणे आढळणाऱ्या त्रुटींची यादी करून त्यापासून कोसोदूर असायला हवे. ऑबसेशन फॉर परफेक्शन म्हणजे परिपूर्णतेचा ध्यास असायला हवा. हा ध्यास आपण बाळगू तेव्हाच आपली कामगिरी निव्वळ 'उत्तम' नव्हे, तर 'अत्युत्कृष्ट' या वर्गवारीत असेल. इतरांच्या चुकांमधून आपण काही शिकणार की नाही वा त्याच ठेचा लागून रक्त सांडवणार, याचा विचार प्रत्येकाने करणे आवश्यक आहे.

चुका व त्रुटी टाळणे व गुणवत्ता सुधारणे यासाठीच्या तुमच्या प्रयत्नांना हार्दिक शुभेच्छा!

– अरविंद खळदकर

## 'महाराष्ट्र भूषण' शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचा आपल्या बँकेतर्फे हृद्य सत्कार



जनता सहकारी बँकेच्या शनिवार, दिनांक २७ जून, २०१५ रोजी झालेल्या ६६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत 'महाराष्ट्रभूषण' पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल बँकेच्या वतीने अध्यक्ष श्री. अरविंद खळदकर यांच्या हस्ते शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. या प्रसंगी बँकेचे उपाध्यक्ष श्री. संजय लेले तसेच संचालक मंडळ सदस्य व अन्य मान्यवर उपस्थित होते.

➤ अन्य सत्कारार्थींचे फोटो पान क्र. ११ वर

## बँकेच्या ४७ व्या कात्रज शाखेचे उद्घाटन




पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. गिरीश बापट दीपप्रज्वलन करताना.

सहकार क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या पुणे जनता सहकारी बँकेने समाजासमोर आदर्श निर्माण केला असून ही बँक खऱ्या अर्थाने सामान्यांच्या पाठीशी उभी राहणारी बँक आहे, असे गौरवोद्गार पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. गिरीश बापट यांनी बँकेच्या कात्रज शाखेच्या उद्घाटन प्रसंगी काढले. आपल्या बँकेची ही ४७ वी शाखा आहे.

➤ पान क्र. १० वर पहा

## वैद्यकीय पदव्युत्तर प्रवेश परीक्षेत अपूर्वा आफळे यशस्वी



आपल्या बँकेचे निवृत्त अधिकारी श्री. गजानन स. आफळे यांची कन्या चि. अपूर्वा गजानन आफळे हिने ऑल इंडिया पोस्ट ग्रॅज्युएट मेडिकल एन्ट्रन्स एक्झाम २०१५ परीक्षा उत्तीर्ण झाली असून तिला गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज औरंगाबाद येथे एम.डी. (ओबीएसटी ॲण्ड गायनिक) साठी प्रवेश मिळालेला आहे.

बँक परिवारातर्फे अपूर्वाचे व तिच्या पालकांचे हार्दिक अभिनंदन!

**अभिनंदन! व हार्दिक शुभेच्छा!**

## ॲथलेटिक्स स्पर्धेत अस्मिता डावरेला सुवर्णपदक

आपल्या बँकेच्या फर्ग्युसन रोड, पुणे शाखेचे कर्मचारी श्री. संभाजी डावरे यांची कन्या कु. अस्मिता हिने महिला तिहेरी उडीमध्ये १०.६२ मीटर उडी मारून सुवर्णपदक मिळविले आहे.

पुणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स संघटनेने आयोजित केलेल्या वरिष्ठ गटाच्या सुशीलादेवी छाजेड स्मृती करंडक पुणे जिल्हा निवड चाचणी मैदानी स्पर्धेत हे यश तिने प्राप्त केले.

जनता सहकारी बँक परिवारातर्फे अस्मिताचे व तिच्या पालकांचे हार्दिक अभिनंदन!

## पुणे सीआयसीडी या विभागातील लेखनिक श्री. नेताजी राजाराम आहेर यांची कन्या कु. तृप्तीचे घवघवीत यश



पुणे सीआयसीडी या विभागातील लेखनिक श्री. नेताजी राजाराम आहेर यांची कन्या कु. तृप्ती नेताजी आहेर हिने जून २०१५ मध्ये झालेल्या बी.एस्सी. (फिजिक्स) या तृतीय वर्षाच्या परीक्षेमध्ये ९३.३५ गुण मिळवून मा. बाळासाहेब जाधव कला, वाणिज्य व विज्ञान आळे या कॉलेजमध्ये घवघवीत यश संपादन केले आहे.


## सेंद्रिय खतनिर्मितीचा देशातील अग्रणी उद्योग : निलेश ठक्कर



शेती, शिक्षणाची पार्श्वभूमी नसताना १४ वर्षांपूर्वी सेंद्रिय खतनिर्मितीत वेगळे काही करण्याच्या जिद्दीने श्री. निलेश ठक्कर यांनी प्रयत्न सुरू केले. २५ फेब्रुवारी २००३ रोजी कॅनेडियन तंत्रज्ञानाच्या मदतीने महाराष्ट्र बायोफर्टिलायझर्स इंडिया प्रा. लि. या कंपनीचा प्रारंभ झाला. ब्राऊनगोल्ड व ह्युमिक ॲसिड अशा दोन प्रॉडक्टने सुरुवातीला उत्पादन सुरू झाले. शास्त्रशुद्ध पद्धतीने सेंद्रिय खताचे उत्पादन करणारा देशातील पहिला कारखाना म्हणून 'एमबीएफ'ची नोंद झाली. सुरुवातीला ५ एकर जागेत उत्पादन सुरू झाले. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात ४५ एकरांत प्रकल्प सुरू झाला व आता तो शंभर एकरांवर विस्तारतो आहे. देशातील १४ राज्यांमध्ये कार्यालये, ➤ पान क्र. ४ वर ...

**लातूर शाखेचे खातेदार व उद्योजक श्री. विष्णुदास भुतडा व श्री. निलेश ठक्कर यांच्या गगनभरारीचा आम्हाला अभिमान वाटतो. त्यांच्या गौरवार्थ त्यांचा परिचय...**

## देशातील 'टॉप फाइव्ह' मध्ये विष्णुदास भुतडा यांचा कीर्ती तेल उद्योग



सन १९६४ मध्ये अतिशय तुटपुंज्या भांडवलावर कीर्ती उद्योगाच्या कमल ऑईल मिलचे रोपटे लातूरमध्ये लावले. ते इतक्या प्रचंड वेगाने वाढले की, भारतातील तेल उद्योगात लातूरच्या 'कीर्ती उद्योगा'चा क्रमांक पहिल्या पाचमध्ये पोहोचला. ८४ वर्षांच्या विष्णुदास भुतडा यांनी ही किमया साध्य केली. सतीश, अशोक, कीर्ती व भारत ही चार मुले; आनंद, अर्जुन, अजित, अंकित हे नातू अशी उच्चशिक्षित फौज त्यांच्या सोबतीला आहे. कीर्ती दालमिल लि., कीर्ती सॉल्व्हेक्स लि., कीर्ती ॲग्रोव्हेट लि., कीर्ती फूड्स लि., कीर्ती ॲग्रोटेक लि., कीर्ती गोल्ड लि., असा मोठा उद्योगसमूह सध्या कार्यरत आहे. लातूर, हिंगोली, नांदेड, सोलापूर, विजापूर या पाच ठिकाणी उत्पादन सुरू आहे. ➤ पान क्र. ४ वर ...

## होम मिनिस्टर कार्यक्रमात दीपक जोशी सहभागी



झी मराठी या चॅनेलवर लोकप्रिय 'होम मिनिस्टर' या कार्यक्रमात बँकेच्या टिळक रोड शाखेतील सेवक श्री. दीपक बाळकृष्ण जोशी व त्यांची पत्नी सौ. ज्योती दीपक जोशी यांना कार्यक्रमात प्रत्यक्ष भाग घेण्याची संधी मिळाली होती.

हा कार्यक्रम झी. मराठी या चॅनलवर दि. १० जून २०१५ रोजी सायंकाळी ६.३० वा. प्रदर्शित झाला. नणंद-भावजय या स्पेशल भागात कार्यक्रम अतिशय रंगतदार व रोमांचकारक झाला.

सदर कार्यक्रमात मराठी रंगभूमीवरील प्रसिद्ध अभिनेते श्री. आदेश बांदेकर यांच्या हस्ते श्री. दीपक जोशी व त्यांची पत्नी सौ. ज्योती यांना उपविजेतेपदाचे बक्षीस मिळाले.

झी मराठी या उपरोक्त कार्यक्रमाचे परदेशातसुद्धा सदर चॅनलवर कार्यक्रम दाखवण्यात आला.

# उद्‌गम करकपात – सहकारी बँकांवर होणारे परिणाम



भारताच्या ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये अनेक संस्था या सहकारी तत्त्वांवर चालविल्या जातात. त्यामध्ये महत्त्वपूर्ण असलेला सहभाग हा सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या बँकांचा आजपर्यंत राहिलेला आहे. या बँकांचा मूळ उद्देश हा त्यांचे सभासदांकडून ठेवींच्या स्वरूपात रक्कम स्वीकारणे, त्यावर त्यांना योग्य त्या दराने व्याज देणे. यापुढे ही बँकांकडे आलेली रक्कम ही गरजू व्यक्तीला कर्जाऊ देणे, आणि त्यावर त्यांचेकडून व्याज घेणे हा असतो. ग्रामीण व शहरी भागात असणाऱ्या सर्व स्तरांवरील व्यक्तींची, व्यावसाईकांची खाती ही सहकारी बँकांमधून आहेत. याचे कारण म्हणजे नियमांमधील लवचीकता, त्वरित निर्णयक्षमता, कार्यक्षम सेवा तत्परता आणि घेतलेल्या निर्णयांची त्वरित अंमलबजावणी होत असल्या कारणांमुळे लोकांना तत्काळ सेवा उपलब्ध होते आहे. आणि याच कारणांमुळे लोकांमध्ये सहकारी तत्त्वांवरील बँका या लोकप्रिय आहेत.

केंद्रीय अंदाजपत्रक २०१५ मध्ये उद्‌गम करकपात या आयकर कायद्यातील तरतुदींमध्ये महत्त्वपूर्ण बदल करणेत आले आहेत. उद्‌गम करकपातीमधील या महत्त्वपूर्ण तरतुदींचा सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या बँकांवर काय परिणाम होणार आहेत हे आपण आता जाणून घेऊ या. दि. १/६/२०१५ पासून सहकारी बँकांकडे त्यांच्या सभासदांनी आणि इतरांनी ठेवलेल्या ठेवींवरील किंवा आवर्ती ठेव योजनेवर दिलेल्या व्याजावर आयकर कायद्यातील कलम १९४ अ मध्ये झालेल्या बदलानुसार उद्‌गम करकपात करणे व ती सरकारकडे जमा करणेची तरतूद बंधनकारक करणेत आली आहे. हे करण्यामागे सरकारचा उद्देश हा आहे की, जास्तीत जास्त लोकांकडून कर गोळा करणे आणि करचुकवेगीरीला आळा घालणे हाच आहे. उद्‌गम करकपात हे सरकारचे हक्काचे उत्पन्नाचे साधन आहे.

आयकर कायदा कलम १९४ अ नुसार बँकेमध्ये असणाऱ्या ठेवींवरील दिलेले व्याज जर रु. १०,०००/- पेक्षा जास्त असेल, तर बँकेला त्या व्याजावर १० टक्के दराने आयकराची उद्‌गम करकपात करावयाची आहे. या तरतुदीला ३१/५/२०१५ पर्यंत अपवाद असा होता की ठेव ठेवणारा ठेवीदार हा जर त्या सहकारी बँकेचा सभासद असेल तर त्यावर करकपातीची जरुरी नव्हती. परंतु १/६/२०१५ पासून या नियमातील अपवाद हा काढून टाकण्यात आला आहे. त्यामुळे ही उद्‌गम करकपात सर्व सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या बँकांना करावीच लागणार आहे. ही बाब आपण खालील उदाहरणाद्वारे समजून घेऊ.

उदा. अ या व्यक्तीने एखाद्या सहकारी बँकेमध्ये रु. १ लाख मुदत ठेव ही १ वर्षाकरिता १२ टक्के व्याजदराने ठेवली. बँकेच्या नियमाप्रमाणे या ठेवीवर १२ टक्के व्याजदराने १ वर्षाकरिता रु. १२०००/-, व्याज देण्यात येणार आहे. अशा वेळी संपूर्ण व्याज हे रु. १०,०००/-, पेक्षा जास्त असल्यामुळे त्या दिलेल्या व्याजावर १० टक्के दराने उद्‌गम करकपात ही बँकेने करावयाची आहे. म्हणजेच १० टक्के दराने रु. १२००/-, हे कर स्वरूपात सरकारकडे जमा करावयाचे आहेत आणि राहिलेले रु. १०८००/-, हे त्या ठेवीदाराचे खात्यावर जमा करावयाचे आहेत.

**ठेवीदाराची जबाबदारी**

१) सर्वप्रथम प्रत्येक ठेवीदाराने आपल्या पॅनची प्रत आपल्या बँकेत द्यावयाची आहे. याचे कारण म्हणजे बँकेने वजा करून सरकारकडे भरलेला कर हा त्या त्या ठेवीदाराचे पॅन खात्यावर सरकारकडे जमा होईल आणि वर्षाचे अखेरीनंतर आयकर विवरणपत्र भरताना त्याची वजावट ठेवीदारास घेता येईल.

२) ठेवीदाराकडे जर पॅन नसेल तर मग मात्र उद्‌गम करकपातीचा दर हा दुप्पट म्हणजेच २० टक्के असेल. त्याप्रमाणे बँकांना तो ठेवीदाराचे व्याजातून वजा करून सरकारकडे भरावा लागेल.

३) ठेवीदाराला आर्थिक वर्ष संपल्यानंतर आयकर विवरणपत्रक भरावे लागेल. अशावेळी त्याची झालेली उद्‌गम करकपातीची खातरजमा त्या त्या ठेवीदाराने आयकर विभागाचे वेबसाईटवर जाऊन व तेथून नमुना क्र. २६ ए एस घेऊन करावयाची आहे.

४) आयकर कायद्यानुसार पुढील प्रकारचे पर्याय ठेवीदारांकरिता दिलेले आहेत. पहिल्या विकल्पानुसार प्रत्येक ठेवीदाराचे वार्षिक उत्पन्नानुसार नमुना १५ जी/एच देणेची मुभा देणेत आलेली आहे. ठेवीदाराचे वार्षिक उत्पन्न हे जर प्रारंभिक माफी मर्यादेपेक्षा (Basic Exemption Limit) कमी असेल तर तो नमुना क्र. १५ जी/एच बँकेकडे सादर करू शकतो. त्यानुसार बँक ही त्या त्या ठेवीदाराची उद्‌गम करकपात करणार नाही; परंतु त्याची माहिती बँकेमार्फत आयकर खात्याकडे कळविली जाईल.



ॲड. श्रीकृष्ण श्री. दीक्षित, पुणे
मो. नं. ९३७१०१००८७

दुसऱ्या पर्यायानुसार आयकर कायदा कलम १९७ अन्वये देणेत येणारा दाखला ठेवीदार आयकर खात्याकडून घेऊ शकतो. एखाद्या ठेवीदाराचे वार्षिक अपेक्षित उत्पन्नावर येणारा कर हा जर १० टक्के पेक्षा कमी असेल, तर असा ठेवीदार आयकर खात्याकडे वर्ष सुरू होणेपूर्वी रीतसर अर्ज करून कलम १९७ नुसार देणेत येणारे कमी उद्‌गम करकपातीचा दाखला मिळवू शकतो. असा मिळालेला दाखला जर बँकेकडे सादर केला, तर त्या दाखल्यामध्ये नमूद केलेल्या कमीकर दराने बँक उद्‌गम करकपात करू शकते.

**बँकेची जबाबदारी**

१) प्रत्येक ठेवीदाराची पॅनची कॉपी बँकेने आपल्याकडे १ जून २०१५ पूर्वी घेणे आवश्यक आहे.

२) केवायसीचे फॉर्म पूर्ण करून ज्यांचेकडून माहिती आली नाही ती वेळेत पूर्ण करून घेणे आवश्यक आहे.

३) प्रत्येक महिन्याला बँकेच्या प्रत्येक शाखेच्या ठेवीदारांना दिलेल्या व्याजाच्या रकमेवरील करकपात योग्य त्या दराने बँकेने करणे आवश्यक आहे.

४) असा कापलेला कर हा योग्य वेळेत सरकारकडे जमा करणे आवश्यक आहे.

५) दर तीन महिन्यांनी म्हणजे एप्रिल-जून, जुलै-सप्टेंबर, ऑक्टोबर-डिसेंबर व जानेवारी-मार्च सर्व कागदपत्रांची पूर्तता करून वेळेत उद्‌गम करकपातीचे वितरणपत्रक त्याचे शुल्कासह बँकेने आयकर खात्याकडे जमा करावयाचे आहे. त्यासाठीची मुदत अनुक्रमे १५ जुलै/ ऑक्टोबर / जानेवारी व ३० एप्रिल आहे.

६) ज्या ठेवीदारांनी नमुना क्र. १५ जी/एच दिलेला असेल त्याची प्रत इतर माहितीसह आयकर खात्याकडे जमा करावयाची आहे.

७) प्रत्येक ठेवीदारास त्याचे उद्‌गम करकपातीचे दाखला हा नमुना क्र. १६ ए मध्ये वेळोवेळी देणे आवश्यक आहे. त्याची मुदत ही

३१ मे आहे.

८) याशिवाय प्रत्येक बँकेला त्यांनी त्यांचे कर्मचाऱ्यांना दिलेल्या पगारावरील देखील आवश्यक त्या ठिकाणी उद्‌गम करकपात करावयाची आहे. बँकेने नेमलेले कंत्राटदार किंवा इतर व्यावसाईक यांना दिलेल्या रकमेवरील उद्‌गमकर कापून घेऊन (आयकर कायद्यातील कलमानुसार आवश्यकतेनुसार) त्याचा भरणा सरकारकडे करून त्याचे विवरणपत्र वेळेत दाखल करावयाचे आहे.



अशाप्रकारे सर्वसामान्य व्यक्तींनी विश्वासाने आपल्या बँकेकडे ठेवलेल्या ठेवींवरील व्याज बँकेने देताना त्यावर उद्‌गम करकपात करावीच लागणार आहे. याशिवाय ही संपूर्ण माहिती आयकर खात्याकडे जमा होणार आहे. आजपर्यंत ज्या ज्या व्यक्तींनी आयकराचे वितरण पत्रक भरलेले नाही त्यांचे बाबतीत मोठी अडचण निर्माण होणार आहे. प्रत्येकाला ज्याचे त्याचे बँकेकडून नमुना क्र. १६ ए घेऊन योग्य त्या अटींची पूर्तता करून आपल्या सर्व ठेवी व त्यावर मिळणारे व्याज हे उद्‌गम करकपात याची सविस्तर माहिती आपल्या करसल्लागारांना देऊन आपले आयकराचे वितरणपत्रक भरावे लागेल. असे करीत असताना ज्यांचे वार्षिक उत्पन्न हे प्रारंभिक माफी मर्यादेपेक्षा कमी आहे किंवा इतर स्रोतातून उद्‌गम करकपात झालेली आहे आणि एकूण भराव्या लागणाऱ्या करापेक्षा जादा कराचा भरणा झालेला असेल, अशा सर्वांना आयकराचा परतावा हा आयकर विवरणपत्रक खात्याकडे जमा करून मागावा लागणार आहे.

सर्वांत जास्त अडचण ही त्या करदात्यांची असणार आहे की ज्यांना त्यांच्या ठेवी या त्यांच्या मागील वर्षीच्या ताळेबंद पत्रकात दाखविल्या नसतील किंवा मिळणाऱ्या ठेवींवरील व्याजाचा तपशील आयकर खात्याच्या निर्दशनास आणून दिलेला नसेल त्यांना या वर्षाचे विवरणपत्रक सादर करताना त्या सर्व ठेवींचा तपशील आयकर खात्याला आता द्यावा लागणार आहे. असे करीत असताना आयकर खाते या वर्षी दाखविलेल्या तपशिलाबाबतच्या उत्पन्नाबाबतची कर भरण्याची खातरजमा करून घेणेकरिता आवश्यक ती माहिती खुलाशांसह मागवू शकते. ही बाब आपण पुढील उदाहरणावरून समजून घेऊ .समजा एखाद्या करदात्यांकडे रु. २० लाखांच्या ठेवी आहेत. जर त्याने त्याचे मागील वर्षीच्या ताळेबंद पत्रकात दाखविलेल्या नसतील, तर अशा प्रसंगी या सर्व ठेवी चालू वर्षीच्या ताळेबंद पत्रकात दाखवाव्या लागतील. परंतु असे करीत असताना त्या करदात्याने ठेवलेल्या ठेवींच्या उत्पन्नाचा ज्या त्या वर्षीच्या खुलाशांसह पुरावा आयकर खात्याने मागविल्यास सादर करावा लागेल. म्हणजेच त्या करदात्यास त्याचा पूर्ण तपशील कोणत्या वर्षी किती उत्पन्न होत, कोणत्या स्रोत्रापासून होतो, हे खुलाशांसह पुराव्यानिशी सिद्ध करावे लागेल आणि ही जबाबदारी पूर्णतः त्या करदात्याचीच असेल. हे मात्र जिकीरीचे आहे. यामुळे येथून पुढे करचुकवेगिरींना आळा बसणार आहे.

**सहकारी बँकांवर होणारे परिणाम–**

३१/५/२०१५ पूर्वी सहकारी बँकांनी त्यांच्या सभासदांचे ठेवींवर दिलेल्या व्याजावर उद्‌गम करकपात करावी लागत नव्हती. परंतु १/६/२०१५ पासून सर्वच बँकांना त्यांचेकडे असणाऱ्या ठेवींवरील दिलेल्या व्याजावर उद्‌गम करकपात करावी लागणार आहे. याचा परिणाम म्हणजे बँकांचे काम हे मोठ्या प्रमाणात काढणार आहे. त्यांना त्याकरिता माहीतगार कर्मचाऱ्यांची व त्याचप्रमाणे करसल्लागाराची नेमणूक करावी लागणार आहे. त्यामुळे ठेवीदारांचा त्रास हा वाढणार असून, त्याचा बँकांच्या ठेवी काही प्रमाणात कमी होण्यावर देखील होऊ शकतो. संपूर्ण भारतभर हा कायदा लागू असल्या कारणाने सर्व बँकांना सारख्याच प्रमाणात याचा त्रास जाणविणार आहे.

असे करीत असताना समजा काही त्रुटी राहिल्या, चुका झाल्या तर किंवा कसूर झाली तर ती संपूर्ण जबाबदारी ही त्या चूक करणाऱ्याचीच असेल. त्याकरिता प्रसंगी व्याज व दंड याचीदेखील कारवाई होऊ शकते. याची तरतूद आयकर कायद्यात करणेत आलेली आहे. याची सर्वांनी नोंद घ्यावी. सर्व कायदेशीर तरतुदींचे योग्य व वेळेवर पालन करून कर, विवरणपत्रके आयकर खात्याकडे दाखल करावीत, जेणेकरून व्याज व दंड याचा ससेमिरा बँकांचे पाठीमागे लागणार नाही, याची काळजी बँकांनी पुरेपूर घ्यावी.

पान क्र. २ वरून ...

## सेंद्रिय खतनिर्मितीचा देशातील अग्रणी उद्योग : निलेश ठक्कर

तर १७ राज्यांत विक्रीचे जाळे पसरले आहे.सुमारे ५४ प्रॉडक्ट्‌सची शृंखला विकसित करण्यात आली. दीड लाख दुकानांतून ५० लाख शेतकरी याचा लाभ घेत आहेत. ६०० पेक्षा जास्त कर्मचारी व सुमारे एक हजार कुटुंबांना या उद्योगामार्फत रोजगार मिळत आहे. मध्य प्रदेशातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महू या जन्मगावी ४०० एकर सेंद्रिय शेतीचा गट 'एमबीएफ'ने निर्माण केला. मध्य प्रदेशातील इंदोरमध्ये ३ हजार शेतकरी केवळ सेंद्रिय शेतीतून सोयाबीन, बटाटा, कांदा, लसूण याचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतात. त्यांच्या बांधावर त्यांचा माल योग्य भावाने खरेदी केला जातो. पूर्वोत्तर राज्यांनी सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली असून, मेघालय व आसाम या राज्यांनी शंभर टक्के सेंद्रिय शेती करण्याचे घोषित केले. एमबीएफच्या ब्राऊन गोल्ड या सेंद्रिय खतनिर्मितीची क्षमता १८ हजार टनांची आहे. आता ती २५ हजार टनांपर्यंत वाढेल.

## देशातील 'टॉप फाइव्ह' मध्ये विष्णुदास भुतडा यांचा कीर्ती तेल उद्योग

महाराष्ट्र, कर्नाटक, छत्तीसगड या राज्यांत दीड हजार ठिकाणी तेल विक्री केंद्रे आहेत. ॲगमार्क, आयएसओ मानांकनही प्राप्त आहे. 'कीर्ती' उद्योगात प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे ७ हजार कुटुंबांना रोजगार उपलब्ध झाला. उत्तर व दक्षिण भारतात प्रत्येक जिल्ह्यातील वाहतुकीचा व्यवसाय करणाऱ्या मंडळींना 'कीर्ती'चे नाव माहीत आहे. लातूर परिसरात कच्चामाल कमी पडला, तर देशातील कोणत्याही प्रांतातून माल खरेदीची पूर्ण यंत्रणा कीर्ती उद्योगाने उभारली. ऑक्टोबरमध्ये सोयाबीनचा जो भाव आहे, त्यापेक्षा मार्च–एप्रिलमध्ये तो कसा चढता राहील, या भावाने कोणालाही माल देण्यास करार करता येईल, असे घोषित केल्याने शेतकऱ्यांना यात लाखोंचा नफा झाला. 'कीर्ती' उद्योगाची व्यवसायातील पकड मजबूत असल्याने सोयाबीनचे लातूरमध्ये काय भाव आहेत, याची दखल देशातील बाजारपेठेला घ्यावी लागते. 'कीर्ती'च्या भावाची नोंद मध्य प्रदेशासह विविध प्रांतात घेतली जाते.

# आपल्या बँकेचे अभिनव उपक्रम

## बँकेने गोड केला चिमुकल्यांचा शाळेचा पहिला दिवस

## दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**शाळेचा पहिला दिवस हा प्रत्येक व्यक्तीसाठी संस्मरणीय असतो. इयत्ता पहिलीच्या शाळेच्या पहिल्या दिवसाची साक्षीदार 'जनता बँक' व्हावी, या उद्देशाने या वर्षी प्रथमच एक अभिनव उपक्रम शाखांतर्फे राबवण्यात आला. शाखांनी याकरिता सेवक सभा घेऊन त्याचे नियोजन केले.**

**या दिवशी सर्व शाखांतर्फे परिसरातील काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे त्यांच्या पालकांसोबत बँकेतर्फे बॅनर लावून स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या हस्ते शाळेत सरस्वती पूजन करण्यात आले व सर्व विद्यार्थ्यांना चॉकलेट व इतर शालोपयोगी वस्तू, पुस्तके वाटप बँकेच्या वतीने करण्यात आले. काही शाखांनी याकरिता ड्रेस कोड ठरवला होता. कार्यक्रमाचे वेळी त्या त्या परिसरातील प्रतिष्ठित लोकदेखील उपस्थित होते. त्यांचे स्वागत बँकेच्या वतीने करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांचे पालकांसोबत फोटो काढण्यात आले. तसेच इयत्ता दहावीच्या परीक्षेत विशेष गुणवत्ता मिळालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करणे हाही एक चांगला उपक्रम याबरोबरच आयोजित केला होता. हे उपक्रम वेगवेगळ्या शाखांमध्ये राबविले गेले त्याचा हा एकत्रित वृत्तांत.**

**बँकेच्या या अनोख्या उपक्रमात सर्व शाखांनी उत्साहात सहभाग नोंदविला.**

**चंदननर शाखा :–** चंदननगर शाखेने दि. १५.०६.२०१५ रोजी शाखा परिसरातील इंडियन एज्युकेशन सोसायटी प्रायमरी अ‍ॅण्ड सेकंडरी स्कूल



शाळेमध्ये जाऊन शाखा व्यवस्थापकांच्या हस्ते इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांना चित्रकलेचे पुस्तक व रंगीत खडू व क्रेऑन याबरोबर बँकेचे सुकुमार ठेव व चिरंजीव ठेव योजनेचे माहितीपत्रक दिले. याचबरोबर इयत्ता १०वीच्या परीक्षेत विशेष गुणवत्ता मिळालेल्या विद्यार्थ्यांचा शाखा व्यवस्थापक यांनी पुष्पगुच्छ व पेढे देऊन सत्कार केला व बँकेच्या विविध योजनांची माहिती नववी- दहावीच्या विद्यार्थ्यांना दिली.

– – –

**टिळक रोड, पुणे शाखा :–** इयत्ता पहिलीच्या वर्गात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्याबाबत शाखेशी संबंधित असलेली म.ए.सो.



ची भावे प्राथमिक शाळा येथे कार्यक्रम करण्याचे निश्चित करण्यात आले.

त्यानुसार सदर मुलांना आत्तापासूनच बचतीची सवय लागावी व बँकेचे नाव या सर्व मुलांच्या घरात पोहोचावे, असा उद्देश असल्याने प्लॅस्टिकचे स्मायली चिन्ह असलेला पैसे साठविण्याचा पिग्मी बॉक्स प्रत्येक विद्यार्थ्यास देण्यात आला व सदर बॉक्स वर बँकेचे नाव व शाखा तसेच 'माझी बँक माझी बचत' अशी टॅग लाइनचे स्टिकर लावण्यात आले.

– – –

**पावस शाखा :–** १६.०६.२०१५ रोजी प्राथमिक शाळातून पहिलीत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. पावस शाखा परिसरात एकूण ७ शाळांमध्ये शाखेतील सेवक श्री. साठे मार्केटिंग प्रतिनिधी, श्री. काळे यांनी भेट दिली.

प्रत्येक विद्यार्थ्याला पट्टी, पेन्सिल, खोडरबर, शार्पनर भेट म्हणून देण्यात आले. सर्व शाळांमधून सदर कार्यक्रमास उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला.



**नवीन दफ्तर, नवीन वही**
**नवीन पुस्तक, एकदम सही**
**नवीन वस्तू, नवीन कंपास,**
**डोळे मिटून घेतलेला**
**कोऱ्या कागदाचा वास**
**नवीन गणवेश, नवीन मित्र**
**नवीन वातावरणात नवीन सत्र,**
**पहिल्या पावसाचे थेंब,**
**कौलारू छपराचा धुंद गंध**
**घट्ट आवळून घेतलेले,**
**दप्तराचे बंध,**
**शाळेचा पहिला दिवस**
**वर्गातला पहिला तास**
**जनता बँकेच्या शुभेच्छांनी**
**झाली दिवसांची सुरुवात!**

सर्व शिक्षकांनी व पालकांनी या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमाबाबत बँकेचे आभार मानले.

पावस परिसरात स्वामी स्वरूपानंद विद्या मंदिर पावस, गो. पटवर्धन विद्यामंदिर कुर्धे या दोन्ही शाळांचा दहावी व बारावी परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. दोन्ही शाळांमध्ये निकालाची सरासरी उत्तम आहे. या शाळांमधून पहिले तीन आलेल्या विद्यार्थ्यांना भेटवस्तू व पुष्प देऊन शाखेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

– – –

**शिवाजीनगर रत्नागिरी शाखा :–** दि. १५.०६.२०१५ रोजी रत्नागिरी येथील ल. ग. पटवर्धन विद्यामंदिर या ठिकाणी एकूण १४० बालगोपालांचे शैक्षणिक साहित्य देऊन स्वागत करण्यात आले. पहिलीच्या वर्गात जाऊन प्रत्येक विद्यार्थ्याला नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी एक छोटीशी भेटवस्तू देऊन त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. भारतीय संस्कृतीप्रमाणे स्वागताला तोंड गोड करण्यासाठी विद्यार्थ्यांना खडीसाखर वाटण्यात आली. कार्यक्रमादरम्यान एकूण १४० विद्यार्थ्यांना पेन्सिल, खोडरबर, शार्पनर व पट्टी अशा भेटवस्तू देण्यात आल्या.

– – –

**बाणेर शाखा :–** दि. १५.६.२०१५ रोजी शाखा परिसरातील कै. बाबूराव गणपत बालवडकर प्राथमिक शाळा, या ठिकाणी शाळेचा १५ जून हा शैक्षणीक वर्षाचा पहिला दिवस होता. इ. पहिलीमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत 'भेटवस्तू व चॉकलेट' देऊन करण्यात आले. साधारण ४० विद्यार्थी इ. पहिलीच्या वर्गात होते.

शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा कमिटी मेंबर इ. ५० मान्यवर सदर कार्यक्रमास उपस्थित होते. शाखा व्यवस्थापक श्री. संजय गायकवाड

यांनी नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींना शुभेच्छा दिल्या.

शाखेमार्फत श्री. गायकवाड, श्री. नाईकरे व श्री. रणपीसे हेही या ठिकाणी उपस्थित होते.

– – –

**कोल्हापूर शाखा :–**

कोल्हापूर शाखा परिसरातील नामवंत शिक्षण संस्थांच्या शाळेतील पहिलीच्या व बालवाडीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शाळेच्या गेटवर पहिल्या दिवशी चॉकलेट व भेटवस्तू (रंगीत तेलखडू बॉक्स) देऊन त्यांचे स्वागत करण्याचा कार्यक्रम साजरा केला.

कार्यक्रम यशस्वीपणे पार पडण्यासाठी शाखा व्यवस्थापक श्री. विनय दुनाखे, सहा. शाखा व्यवस्थापक श्री. उदय कुलकर्णी, कनिष्ठ अधिकारी श्री. श्रीराम दातार व श्री. चंद्रकांत माने, लेखनिक श्री. कुंडलिक पाटील, कु. तृप्ती दिवटे, कु. पल्लवी जोग, श्री. कुणाल सुतार, श्री. राजेंद्र येसणे, श्री. रमेश सोरटे, तसेच शिपाई सेवक – श्री. प्रदीप मोहिरे व श्री. दत्तात्रय कुलकर्णी यांनी सहभाग घेतला.

– – –

**नेहरूनगर, पिंपरी, पुणे शाखा :** बँकेतर्फे एकत्रितरीत्या ठरवण्यात आलेल्या इ. पहिलीच्या शालेय विद्यार्थ्यांच्या स्वागताचा कार्यक्रम आपल्या पिंपरी शाखेतर्फे देखील मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. दि. १५ जून २०१५ रोजी भारतीय जैन संघ, एस.एन.बी.पी. इंटरनॅशनल



स्कूल, प्रथमेश हायस्कूल या शाळांमधील इयत्ता पहिली तसेच छोटी व मोठी बालवाडीच्या मुलांना पटांगणात एकत्रित आणण्यात आले. शाळेचा पहिला दिवस असल्याने त्यांचे आपल्या सर्वांतर्फे स्वागत करण्यात आले. तसेच आपल्या शाखा व्यावस्थापकांतर्फे मुलांसाठी काही खेळ खेळण्यात आले. व नंतर त्यांना या कार्यक्रमाचे महत्त्व काय व विद्यार्थी म्हणून त्यांनी पुढील काळात काय करायचे आहे, यावर मार्गदर्शन करण्यात आले. यानंतर सर्व विद्यार्थ्यांना चित्रे रंगवण्याची पुस्तके तसेच चॉकलेट्सचे वाटप करण्यात आले. भारतीय जैन संघ या शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. यानंतर सर्व विद्यार्थी, शिक्षक तसेच पालक यांच्याशी संवाद साधून त्यांना अपील पत्रके वाटण्यात आली. बँकेचा बॅनर लावून त्या ठिकाणी काउंटर टाकण्यात आला. या ठिकाणी पालकांचे परिचयपत्रक भरून घेण्यात आले.

– – –

**शिवाजीनगर, पुणे शाखा :** दि. १५/०६/२०१५ रोजी शिवाजीनगर शाखेतर्फे शाखेच्या परिसरातील असलेल्या मॉडर्न प्राथमिक शाळा, पी.ई. सोसायटीची इंग्लिश मीडियम शाळा, भारत इंग्लिश स्कूलची इंग्लिश मीडियम प्रायमरी शाळा या शाळांमध्ये शाखेतील सर्व सेवकांनी प्रत्यक्ष जाऊन नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी शाळेत आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे व त्यांच्या सोबत असलेल्या पालकांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच सर्व पालकांना बँकेच्या विविध ठेव योजनांची (उदा. शुभाशिष, सुकुमार ठेव व चिरंजीव बचत ठेव योजना तसेच हसेबंद व लखपती ठेव योजना इ.) माहितीपत्रके देऊन प्रत्येक योजनांची सविस्तर माहिती सांगण्यात आली.

– – –

**शनिवार – नारायण पेठ शाखा. पुणे :**

सोमवार, दि. १६ जून रोजी शाखेतर्फे डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या न्यू. इंग्लिश मीडियम प्रायमरी स्कूल मधील इ. १लीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

शाखेतर्फे प्रत्येक विद्यार्थ्याला पट्टी, खोडरबर व टोकयंत्र यांचे पॅकिंग करून त्यावर जनता बँक शनिवार, नारायण पेठ तर्फे सप्रेम भेट असे स्टिकर चिकटवून तयार केलेली पाकिटे शाखेतील व्यवस्थापक श्री. महेश काळे व सहाय्यक शाखा व्यवस्थापक श्री. अनिल पंचवाघ यांचे हस्ते देण्यात आली. शाखेतर्फे मिळालेल्या भेटीमुळे मुलांना आनंद होत होता. प्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. स्मिता कुलकर्णी व शाळेतील अन्य शिक्षिका उपस्थित होत्या.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाखेतील कु. नम्रता कुलकर्णी व श्री. विलास चिल्लाळ, श्री. अतुल कुसाळकर यांनी प्रयत्न केले.

– – –

**बाजीराव रोड शाखा :–** इयत्ता पहिलीच्या वर्गात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्याविषयी कार्यक्रम आयोजित केला.

एच.एच.सी.पी. हायस्कूल प्राथमिक शाळा येथील मुख्याध्यापक सौ. पुरंदरे यांच्या सहकार्याने कार्यक्रम सुनियोजितपणे पार पडला.

कार्यक्रमासाठी शाखेतील पाच महिला सेविका, दोन शिपाई बंधू व सह शाखा व्यवस्थापक अशी आठ जणांची टीम गेली होती. प्रत्येक वर्गात जाऊन वर्ग शिक्षिकेचे फूल देऊन स्वागत केले. महिला सेविकांनी बँकेतर्फे स्वागत करून माहिती सांगण्यात आली. मुलींच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

– – –

**मार्केटयार्ड शाखा :–**

शाखेने नियोजित कार्यक्रमानुसार पहिलीतील २ शाळांना महावीर इंग्लिश मीडियम स्कूल व पुणे महानगरपालिका क्र. १०५ इंग्लिश व मराठी मीडियम स्कूल येथे भेट देऊन, इयत्ता पहिलीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना पेन्सिल/लेड, रबर सेट व कॅडबरी देऊन त्यांचे स्वागत केले.

या कार्यक्रमात शाखेच्या सर्वच सेवकांनी उत्साहाने प्रतिसाद दिला.श्री. चिपळूणकर, श्री. चाबुकस्वार, श्री. बलकवडे, श्री. जांभुळकर, श्री. खरे यांनी शाळेत जाऊन कार्यक्रम पार पाडला.

– – –

**कर्वेनगर शाखा :–**

शाखेच्या परिसरातील विद्या प्रतिष्ठान शिशुमंदिर प्रशालेमध्ये शिशुगट व इ. पहिलीमधील एकूण १७० विद्यार्थ्यांना क्रेऑन बॉक्स शाखेतर्फे शुभेच्छाचा स्टिकर लावून वाटण्यात आल्या. त्या वेळी उपस्थित पाल्यांना कार्यक्रमाचे औचित्य सांगून शाखेतर्फे विविध योजनांची माहिती देण्यात आली.

महानगरपालिकेची परिसरातील सम्राट अशोक विद्यालय व जीवन शिक्षण मंदिर या शाळेमध्ये शाखेतील सेवक व अधिकारी गोळे असता महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते. संबंधितांनी बँकेच्या उपक्रमाचे स्वागत केले.

– – –

**कडवई शाखा :–**

शाखा व्यवस्थापक श्री. मिलिंद आठल्ये व शिपाई श्री. चंद्रकांत मेणे यांनी कडवई व शेजारील गाव चिखली येथील प्राथमिक शाळात जाऊन पहिलीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा व भेटवस्तू दिल्या. कडवई शाळेत दोन शिक्षक व २२ विद्यार्थी हजर होते. सर्वांचे स्वागत करून श्री. आठल्ये यांनी मुलांना भेट वस्तू व खाऊ दिला. तसेच सर्वांना या कार्यक्रमाच्या आयोजनामागील बँकेचा उद्देश व बँकेच्या योजना याबाबत माहिती दिली.

कार्यक्रमाला शाळेचे स्थानिक कमिटी अध्यक्ष, चिखलीच्या सरपंच, शाळेच्या मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक वर्ग, पालक, सुमारे १३० विद्यार्थी हजर होते.

– – –

**घोडनदी शाखा :–** शाखेच्या परिसरातील विद्याधाम प्राथमिक प्रशाला येथे पहिलीच्या मुलामुलींच्या पहिल्या शैक्षणिक दिवसाचा शुभारंभ संपन्न झाला. सादर प्रसंगी शाखेचे खातेदार श्री. सचिन कातोरे, शाळेच्या मुख्याध्यापिका, शाखेचे खातेदार श्री. तांबोळी तसेच शाळेतील शिक्षक व

प्राथमिक तसेच माध्यमिक शाळेचा पालक वर्ग उपस्थित होता.

तसेच शाखापरीसरातील माहेर या संस्थेतील अनाथ मुले व मूक बधीर मुलांच्या शाळेतही संपर्क करून तेथील १५ विद्यार्थ्यांना सादर भेट वस्तू दिली. तसेच मूक बधीर मुलांच्या पालकांना ठेवी ठेवणे संदर्भात संपर्क करणेसाठी शाखेची माहिती दिली.

कार्यक्रम संपन्न होणेसाठी शाखेतील सर्व सेवकांनी सहभाग दिला. श्री.कोंढाळकर व श्री. चव्हाण यांनी विशेष प्रयत्न केले.

– – –

**विलेपार्ले शाखा :–**

उन्हाळी सुट्टीनंतर १५ जून २०१५ हा विद्यार्थ्यांचा शाळेत जायचा पहिला दिवस.

विलेपार्ले शाखेच्या वतीने शाळेच्या प्रवेशद्वाराजवळ विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी शाखा व्यवस्थापक व शाखेतील अधिकारी शैलेश घोसाळकर, सुहास कोंडेकर तसेच सेवक सुहास दामले, वृषाली मांडे, वैशाली शिरसाट, संकेत धामणे, कुणाल पावसकर उपस्थित होते. शाखेच्या वतीने चॉकलेट व बारा स्केचपेन असलेला सेट प्रत्येक विद्यार्थ्यांला भेटवस्तू म्हणून देण्यात आला.

– – –

**भोर शाखा :–**

भोर शाखेतर्फे इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांचे असे सहर्ष स्वागत करण्यात आले.




## शाखा वर्धापनदिनाच्या शुभेच्छा !

| | |
|---|---|
| ● जालना रोड, औरंगाबाद | १९ ऑगस्ट |
| ● घाटकोपर, मुंबई | २५ ऑगस्ट |
| ● बोरिवली, मुंबई | २५ ऑगस्ट |
| ● चंदननगर, पुणे | २६ ऑगस्ट |
| ● सहकारनगर, पुणे | २७ सप्टेंबर |
| ● बाजीराव रोड, पुणे | १८ ऑक्टोबर |
| ● कोल्हापूर | २९ ऑक्टोबर |

# बाजीराव रोड शाखा – चालू ठेव खाते अभियान 'संकल्प १०१'

बाजीराव रोड शाखेच्या वार्षिक नियोजनानुसार दिनांक ५ जून २०१५ ते ३० जून २०१५ या कालावधीमध्ये (२५ दिवस) नवीन चालूठेव खाती उघडण्याचे अभियान राबविण्यात आले. या २५ दिवसांमध्ये नवीन १०१ खाती उघडण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. अभियानास 'संकल्प १०१' असे नाव देण्यात आले होते. दिनांक ५ जून २०१५ रोजी बँकेच्या नियोजन व मार्केटिंग विभागाचे उपमहाव्यवस्थापक श्री. सुनील कामत व जून २०१५ या महिन्यामध्ये पहिले चालूठेव खाते उघडलेले ग्राहक श्री. संजय माटे यांच्या संयुक्त हस्ते अभियानाचे उद्घाटन झाले.

अभियानाचे नियोजन करण्यात आले होते. त्याचा संक्षेपाने उल्लेख खालीलप्रमाणे :

१) सन २०१३–१४ व सन २०१४–१५ या आर्थिक वर्षात उघडली गेलेली नवीन चालू ठेव खाती अनुक्रमे १२२ व १२३ एकूण २४५ खाती, आठ गटांना विभागून देण्यात आली.

२) उपरोक्त उल्लेखित दोन वर्षांमधील बंद झालेली एकूण ९८ खाती आठ गटांना विभागून देण्यात आली.

३) बाजीराव रोड शाखेच्या संपूर्ण परिसराचे २५ विभागांमध्ये विभाजन करण्यात आले त्यानुसार आठ गटांना त्यांचे कार्यक्षेत्र ढोबळ मानाने ठरवून देण्यात आले.

४) प्रस्तावित खातेदारांशी संपर्क करताना तोंडी माहितीबरोबरच चालू ठेव व स्वधन ठेव यांचे एक संयुक्त पत्रक खातेदारांना देण्यासाठी तयार करण्यात आले होते.

५) संपर्क केलेल्या प्रत्येक प्रस्तावित ग्राहकाची संक्षिप्त माहिती छापील नमुन्यामध्ये तयार केलेल्या फॉर्ममध्ये भरण्याची व्यवस्था केली होती.

प्रत्येक गटामध्ये साधारणत: ६ सेवक होते. शाखेमध्ये या निमित्ताने करण्यात आलेली सजावट, 'संकल्प १०१'च्या लावण्यात आलेल्या प्रतिकृती, सर्व सेवकांना याच प्रतिकृतीचे देण्यात आलेले बॅच आणि उपरोक्त नियोजनास सर्व सहकाऱ्यांनी परिश्रमपूर्वक सकारात्मक प्रतिसाद दिला. ११७ नवीन चालू ठेव खाती या अभियान कालावधीमध्ये मिळविण्यात यश मिळाले.

दिनांक १ जुलै २०१५ रोजी बँकेचे सहाय्यक महाव्यवस्थापक व हिशोब विभाग प्रमुख श्री. आशिष कुवळेकर यांच्या उपस्थितीत अभियानाची सांगता झाली. त्यांनी शाखेच्या प्रयत्नांचे आवर्जून कौतुक केले.

## सेवकाचे हास्य ग्राहकाशी नाते जोडते

अंतरंग

सतत बदलत्या बँकिंग क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञान येत आहेत. उदा. ए.टी.एम., इंटरनेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, फोन बँकिंग या तंत्रज्ञानाचा उपयोग ग्राहकांना होऊन बँकेतील कर्मचाऱ्याचा कामाचा ताण कमी व्हावा हा हेतू असतो, तसेच ग्राहकांना जलद सेवा मिळावी हा प्रयत्न असतो. मात्र देशातील प्रत्येक व्यक्तीला या 'लेटेस्ट टेक्नोलॉजी'चा उपयोग करणे शक्य नसते. जे ग्राहक या सेवांचा उपयोग करतात ते सुशिक्षित असून देखील काही वेळा अशिक्षितासारखे वागतात (उदा. बँकेकडून कोणासही आपल्या इंटरनेट बँकिंग किंवा ए.टी.एम.चा पासवर्ड/पिन अनोळख्या व्यक्तीला देणे), मात्र यातील निम्याहून निम्मे ग्राहक हे या सुविधांचा लाभ घेत नाही, कारण त्यांना या सुविधा माहिती नसतात किंवा त्यांना पारंपरिक सुविधाच अधिक प्रिय असतात. त्यासाठी ग्राहकांना सेवा देताना आपुलकीची भावना ठेवावी, त्यांच्या शंकांचे योग्य प्रकारे निरसन करावे, कारण 'सेवकाचे एक हास्य ग्राहकाशी नाते जोडते आणि याच नात्यातून बँकेची प्रतिमा उंचावते आणि याच उंचावलेल्या प्रतिमेतून बँकेची आर्थिक भरभराट होते.'

**श्री. योगेश दत्ताराम नार्वेकर**
ग्राहक, पावस शाखा

# ताणतणावांवर पुष्पौषधे

ताणतणावांवर मात करण्यासाठी उपलब्ध उपायांमध्ये पुष्पौषधांचा वापर हा निर्धोक आणि रामबाण उपाय आहे. ब्रिटीश चिकित्सापद्धतीची गोड चवीची दुष्परिणामविरहित पुष्पौषधे ताणावर ताण करण्यासाठी मदत करतात. वाढत्या स्पर्धा, अपेक्षाभंगामुळे ताणतणावांचे निरनिराळे दुष्परिणाम होण्यासाठी शक्यता असते. भीती, काळजी, नैराश्य, आत्मविश्वासाचा अभाव, थकवा, चिडचिड, व्यसनाधीनता, हळवेपणा, निद्रानाश यापैकी त्रास होऊ शकतात. पुष्पौषधे सर्व वयांच्या, पेशांच्या व्यक्तींना फायदेशीर ठरतात. सर्वच पुष्पौषधे गुणकारी आहेत. त्यापैकी काहींचा धावता आढावा आपण चार लेखांमध्ये घेणार आहोत.

तणावग्रस्त व्यक्ती काळजीग्रस्त होते. अशी व्यक्ती स्वत:बरोबर इतरांनाही त्रास देऊन काळजीग्रस्त करते. 'रेड चेस्टनट' हे पुष्पौषध दिल्याने छातीत धडधडणे, रक्तदाब कमी-अधिक होणे, श्वासोच्छवास उथळ, अपुरा होणे हे त्रास कमी होतात. 'रेड चेस्टनट' पेशंटला स्वत:च्या तसेच कुटुंबीयांच्या आजारांची प्रकृतीची काळजी, एकंदरीत भवितव्याची काळजी सतावते. 'रेड चेस्टनट' घेण्याने बैचैनी, अस्वस्थता, तगमग, मावळून मनुष्य कामावर लक्ष केंद्रित करू शकतो.

आत्मविश्वासाचा अभाव ही समस्या तर कोणत्याही वयाच्या, पेशाच्या माणसाला भेडसावू शकते. दीर्घकाळाचे प्रकृती अस्वास्थ्य किंवा वारंवार अपयश येण्यामुळे आत्मविश्वास खचतो.



तीव्र स्पर्धेत मनुष्य कमी पडल्यास बाहेर फेकला जातो. असफलतेमुळे येणारी निराशा माणसाला आणखी मागे खेचते, नवे काम करायला, आव्हान स्वीकारायला मनाची तयारीच होत नाही. या दुरावस्थेमधून 'लार्च' मनुष्याला बाहेर काढते. हरपलेला आत्मविश्वास 'लार्च' घेण्याने परत येतो कामामध्ये काही काळ खंड पडून नंतर कामावर परत रुजू होताना आत्मविश्वासाची उणीव भासते. स्त्री-कर्मचाऱ्यांमध्ये ही समस्या प्रामुख्याने आढळते. विवाह, अपत्य संगोपन, कौटुंबिक जबाबदाऱ्या जोडीदारबरोबर त्याच्या बदलीच्या गावी जावे लागल्याने स्त्रियांच्या करिअरमध्ये अडथळे येतात पुनश्च कामला लागताना काम जमेल की नाही ही शंका सतावते.

तणावामुळे शरीर प्रकृतीची नासाडी होते. अतिश्रमामुळे येणाऱ्या थकव्यावर 'ऑलिव्ह' हे पुष्पौषध टॉनिक आहे. कार, ट्रेन किंवा विमानाचा सततचा प्रवास माणसाला दमवतो. त्रैमासिक/अर्धवार्षिक वित्तीय अहवाल तयार करणाऱ्या बँक कर्मचाऱ्यांना, उत्तरपत्रीकांचे ढीग तपासणाऱ्या शिक्षकांना, परिषदांच्या संयोजकांना खूप श्रम पडतात. दीर्घ आजारपणानंतर, शस्त्रक्रियेनंतर जाणवणाऱ्या थकव्यावर उपचार म्हणून, तसेच थकवा टाळण्यासाठी आधीपासूनच प्रतिबंधक उपाय म्हणून 'ऑलिव्ह' घेतल्यास मनुष्य ताजातवाना होतो. संगणक वापरून बोटे, डोळे, मान दुखणे, बैठ्या कामामुळे पाठ दुखणे अशा एकेकट्या अवयवाच्या वेदना, थकवाही ऑलिव्हमुळे नाहीसा होतो.

पुष्पौषधे म्हणजे वनौषधे/आयुर्वेदिक किंवा होमिओपॅथिक औषधे नव्हेत. डॉ. एडवर्ड बॅच या ब्रिटिश डॉक्टरांनी बॅच फ्लॉवर थेरपी म्हणजे पुष्पौषध चिकित्सा पद्धतीचा शोध ८५ वर्षांपूर्वी लावला. मनाला केंद्रस्थानी ठेवून मदत करणारी ३८ औषधे त्यांनी शोधली. मन आनंदी, निर्भय, सकारात्मक, आशावादी करून पुष्पौषधे शरीराकडे सकारात्मक संदेश पोहोचवतात.

परमेश्वराचं लाडकं अपत्य असलेल्या मानवाला दु:खमुक्त, तणावमुक्त करणाऱ्या नैसर्गिक पुष्पौषधांविषयी आणखी माहिती आपण पुढल्या तीन लेखांमध्ये घेऊ.

**सौ. सरोज शरद भडभडे, पुणे**
**मो : ९८५०९७७८७५**

# एक्झिक्युटर व ट्रस्टी विभाग

इच्छापत्र, विविध संस्था ट्रस्ट चे विश्वस्त म्हणून बँकेच्या एक्झिक्युटर व ट्रस्टी विभागाच्या वतीने कामकाज पाहिले जाते. संस्था नोंदणी ते कामकाजाचे व्यवस्थापन या विभागामार्फत केले जात असते. या विभागात असलेल्या काही ट्रस्टच्या वतीने नुकतेच चालू शैक्षणिक वर्षात काही विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य करण्यात आले. त्या विश्वस्त संस्थांची माहिती खालीलप्रमाणे :

१) पुरुषोतम नारायण भोगटे फाउंडेशन :- सदर फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत तर काही विद्यार्थ्यांना विनव्याजी कर्जाऊ शैक्षणिक मदत दिली जाते. या वर्षी विश्वस्त निधीचे अध्यक्ष श्री. पु. ना. भोगटे यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक बिनव्याजी कर्जाऊ रक्कम न देता ती रक्कम आर्थिक मदत स्वरूपात देण्याचा निर्णय दिला. त्यानुसार विभागाने स्थानिक वर्तमानपत्रातून निवेदन प्रसिद्धीसाठी देऊन ज्या विद्यार्थ्यांना देश परदेश शैक्षणिक कार्यासाठी आर्थिक मदतीची आवश्यकता आहे त्यांनी मदतीसाठी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले. त्यास प्रतिसाद म्हणून ७४ जणांनी विभागाकडे अर्ज सादर केले. त्या अर्जांची छाननी होऊन गरजू, होतकरू, आर्थिकदृष्ट्या कमकुवत अशा ४० जणांना मुलाखतीसाठी बोलावून प्रत्येकाची आर्थिक मदतीची रक्कम निश्चित करण्यात आली. त्याची एकूण रक्कम रु. २,००,००० (दोन लक्ष) अशी शैक्षणिक आर्थिक मदत देण्यासाठी ठरविण्यात आली. फाउंडेशनच्या सर्वच विश्वस्तांचे विशेष सहकार्य या कामी लाभले.

२) सुमती विनायक जोग ट्रस्ट : या ट्रस्टच्या वतीने गरजू होतकरू आर्थिकदृष्ट्या कमकुवत विद्यार्थी व व्यक्ती याना वैद्यकीय, शैक्षणिक मदत केली जाते. चालू वर्षात या ट्रस्टच्या वतीने वैद्यकीय मदत रु. १०,०००/- तर शैक्षणिक मदत रु. ५०,०००/- करण्यात आली. ट्रस्टचे विश्वस्त श्री. भालचंद्र जोग यांचे विशेष सहकार्य या कामी लाभले.

३) शारदा विष्णू चॅरिटेबल ट्रस्ट : या ट्रस्टच्या वतीने त्यांच्याकडे असणारा कै. दाबके यांचा फ्लॅट स्वानंद जनकल्याण प्रतिष्ठान यांना विवेकानंद अभ्यासिका चालू करण्यासाठी विनामोबदला उपलब्ध करून देण्यात आला आहे. याकामी ट्रस्टचे विश्वस्त श्री. संजीव जोशी व सौ. कस्तुरी आपटे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# साखरपा शाखेचे नूतन वास्तूमध्ये स्थलांतर व एटीएम केंद्राचे उद्घाटन





साखरपा शाखेचे दि. २१ जुलै रोजी प्रशस्त जागेत स्थलांतर झाले; तसेच एटीएम केंद्राचे उद्घाटन झाले. साखरपा येथील उद्योजक श्री. गिरीश सरदेशपांडे यांचे हस्ते नवीन वास्तूचे, तर गावाचे सरपंच श्री. अजय सावंत यांचे हस्ते एटीएम केंद्राचे उद्घाटन झाले. या वेळी बँकेतर्फे मा. उपाध्यक्ष श्री. संजय लेले, संचालक श्री. खोमणेसाहेब, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंत कुलकर्णी, जनरल मॅनेजर श्री. केतकरसाहेब तसेच श्री. अभय बापटसाहेब, श्री. राधाकृष्ण लिमये उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंत कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. श्री. गिरीश सरदेशपांडे यांनी नव्या जागेत बँकेची भरभराट जोरात होईल, अशा शुभेच्छा दिल्या. मा. श्री. लेलेसाहेबांनी साखरपा गावातील ग्राहकांना २४ तास सेवा देता यावी याकरिता एटीएम मशिन सुरू केल्याचे, तसेच कोकणात लांजा येथे नवीन शाखा लवकरच सुरू करीत असल्याचे सांगितले. मान्यवरांचा सत्कार तसेच नवीन जागामालक श्री. पाथरे व इतर एजन्सीज यांचे शाल, श्रीफळ व झाडांची रोपे देऊन सत्कार करण्यात आला.

शाखा व्यवस्थापक श्री. अंकुश बेटकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. श्री. संदीप गानु यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

या कार्यक्रमानिमित्त गावातील उद्योजक महिलांचे एकत्रीकरण केले होते, त्यावेळी ३२ महिला उपस्थित होत्या. शाखा व्यवस्थापक श्री. अंकुश बेटकर यांनी दुर्बल घटकाकरिता असलेली कर्ज योजना सांगितली व उपस्थितांचे आभार मानले.

## चला बोलू या... गुजरातीमध्ये

| | | | |
|---|---|---|---|
| १ | तुझे नाव काय? | तारु नाम शु छे? | તારુ નામ શું છે? |
| २ | तुमचे नाव काय? | तमारु नाम शु छे? | તમારું નામ શું છે? |
| ३ | तुम्ही/तू कोठे राहता? पत्ता काय? | तमे क्या रहो छो? सरनामु शु छे? | તમે ક્યા રહો છે? સરનામું શું છે? |
| ४ | तुझे/आपले वय किती? | तारी/तमारी उमर शु छे? | તારી/તમારી ઉંમર શું છે? |
| ५ | तुम्ही तुमचे सेव्हिंग्ज खाते उघडावे ही विनंती. | तमे तमारु बचत खातो चालु करो ये अमारी विनंती. | તમે તમારુ બચત ખાતો ચાલુ કરો યે અમારી વિનંતી. |
| ६ | जनता बँकेद्वारे आम्ही नक्कीच तत्पर व सौजन्यपूर्ण सेवा देऊ. | जनता बेंकद्वारा आमे नक्की तत्पर अने परिपुर्ण सेवा आपी शु. | જનતા બેંકદ્વારા આમે નક્કી તત્પર અને પરિપુર્ણ સેવા આપી શુ. |
| ७ | तुम्ही फिक्स्ड डिपॉझिट सुद्धा ठेवू शकता. | तमे फिक्स डिपॉझीट पण करी शको छो | તમે ફિક્સ ડિપૉઝીટ પણ કરી શકો છો. |
| ८ | आमच्याकडे लॉकर्स, नेट बँकिंग शेअर्स, डिमॅट अकौंट अशा अनेक सुविधा आहेत. | अमारे त्या लॉकर, नेटबेन्किंग, शेअर्स, डिमॅट अेकाऊन्ट अवी अनेक सुविधाओ उपलब्ध छे. | અમારે ત્યા લૉકર, નેટ બેન્કિંગ, શેઅર્સ, ડિમૅટ એકાઉન્ટ અવી અનેક સુવિધાઓ ઉપલબ્ધ છે. |
| ९ | आमच्याकडे कर्जाच्या विविध योजना आहेत. | अमारे त्या कर्जमाटे विवीध योजनाओ छे. | અમારે ત્યા કર્જમાટે વિવીધ યોજનાઓ છે. |
| १० | आम्ही घर बांधायला कर्ज देतो, तसेच घर तारण घेऊन व्यवसायासाठी सुद्धा कर्ज देतो. | अमारी बेन्क घर बधावामाटे तेमज घर गिरवी रखीने कर्ज आये छे. | અમારી બેન્ક ઘર બધાવામાટે તેમજ ઘર ગિરવી રખીને કર્જ આયે છે. |
| ११ | आमची बँक सहकारी क्षेत्रात अग्रणी आहे. | अमारी बेन्क सहकारी क्षेत्रमा अग्रणी छे. | અમારી બેન્ક સહકારી ક્ષેત્રમા અગ્રણી છે. |
| १२ | आमची बँक आता ७० वर्षे जुनी होईल. | अमारी बेन्क अवे ७० वर्ष पुरानी छे. | અમારી બેન્ક અવે ૭૦ વર્ષ પુરાની છે. |
| १३ | आमची बँक काळाप्रमाणे सतत बदलते. | अमारी बेन्क समयअनुसार बदल घडावे छे. | અમારી બેન્ક સમયઅનુસાર બદલ ઘડાવે છે. |
| १४ | ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन आम्ही योजना आखतो. | ग्राहकोनी गरजो अनुसार योजना तैयार करीये छे. | ગ્રાહકોની ગરજો અનુસાર યોજના તૈયાર કરીયે છે. |
| १५ | पुन्हा नक्की भेटू. | पाछु नक्की मळीशु. | પાછુ નક્કી મળીશુ. |

## आंतरराष्ट्रीय योग दिवस बाजीवराव रोड शाखेमध्ये साजरा

दि. २१/०६/१५ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवसाच्या निमित्ताने क्रीडाभारती पुणे व जनता बँक पुणे, स्टाफ वेलफेअर असोसिएशन, कलाक्रीडा मंडळ व जनता वेलफेअर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने बाजीराव रोड शाखेच्या टेरेसवर सकाळी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. क्रीडाभारतीचे सुभाषराव कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.



सदर कार्यक्रमामध्ये योग व सूर्यनमस्कार प्रात्यक्षिके झाली. या कार्यक्रमास बँकेचे उपाध्यक्ष मा. संजय लेले, असो.चे अध्यक्ष पराग ठाकूर, सोसायटीचे अध्यक्ष श्री. किशोर चव्हाण, क्रीडाभारती पुणेचे मंत्री श्री. राजेंद्र शिदोरे, त्याचप्रमाणे बँकेतील सुमारे १०० सेवक उपस्थित होते.

## बँकिंग परीक्षेमधील यशाचे मानकरी

**श्री. सुनील महादेव जोशी**
बाजीराव रोड शाखा
कनिष्ठ अधिकारी
जेएआयआयबी उत्तीर्ण

## श्री. जयंत मनोहर केतकर यांची महाव्यवस्थापकपदी नियुक्ती



श्री. जयंत मनोहर केतकर यांची आपल्या बँकेच्या महाव्यवस्थापकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी दि. १/०७/२०१५ पासून कार्यभार स्वीकारला आहे. श्री. केतकर यांना चार दशकांचा प्रदीर्घ असा बँकिंग क्षेत्राचा अनुभव आहे. त्यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. निवृत्तीचे वेळी ते डेप्युटी जनरल मॅनेजर या पदावर स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये कार्यरत होते.

कुशल प्रशासक, अनुभवी मार्गदर्शक, व्यावसायिक कौशल्ये प्रत्यक्ष कृतीत उतरवणारे श्री. केतकर हे उत्तम क्रिकेटपटू व जाणकार संगीत रसिकही आहेत.

## ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ लेखक भालचंद्र नेमाडे यांचा फर्ग्युसन कॉलेज रोड शाखेमध्ये सत्कार



आपल्या फर्ग्युसन रोड कॉलेज शाखेतील प्रतिष्ठित खातेदार मा. श्री. भालचंद्र नेमाडे यांचे बचत खाते आपल्या बँकेत बारा वर्षांपासून आहे. हे आपल्यासाठी अभिमानास्पद आहे. मा. श्री. भालचंद्र नेमाडे हे चौथे मराठी साहित्यिक आहेत की ज्यांना 'ज्ञानपीठ पुरस्कार' देण्यात आला. मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दि. २५ एप्रिल २०१५ रोजी पुरस्कार देऊन गौरवण्यात आले होते.

गुरुवार, दि. ११ जून २०१५ रोजी श्री. व सौ. नेमाडे नेहमीप्रमाणे शाखेत आले असता त्यांचा सहाय्यक शाखा व्यवस्थापक श्री. पांडुरंग ना. पढार यांच्या हस्ते शाखेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी शाखेत सर्व ग्राहक व सेवक उपस्थित होते. मा. श्री. नेमाडे यांनी बँकेच्या व सेवक देत असलेल्या सेवांबद्दल समाधान व्यक्त केले.

➤ पान क्र. १ वरून

## बँकेच्या ४७ व्या कात्रज शाखेचे उद्घाटन

ना. गिरीश बापट पुढे म्हणाले की, जनता बँकेने व्यवसायाबरोबरच सामाजिक भानही चांगले जपले आहे. सर्वसामान्यांचा पैसा सुरक्षित ठेवण्याची जी प्राथमिक जबाबदारी आहे, ती या बँकेचे संचालक विश्वस्तांच्या भूमिकेतून पार पाडीत आहेत. सहकार क्षेत्राचे खरे काम हे समाजसेवेचे आणि आर्थिक स्थिती उंचावण्याचे आहे. पुणे शहराच्या विकासासाठी देखील कर्जरुपाने जनता बँकेने महाराष्ट्र शासनाला मदत करावी. सर्वांचे स्वागत करुन बँकेचे अध्यक्ष श्री. अरविंद खळदकर म्हणाले की, पुणे जनता बँकेला रिझर्व्ह बँकेने नुकतीच १८ शाखांची परवानगी दिली असून कात्रज ही त्यापैकी पहिली शाखा आहे. लवकरच मुलुंड (पश्चिम), पेण, उदगीर, जालना, अहमदनगर, नाशिक व गांधीनगर (कोल्हापूर) या ठिकाणी शाखा सुरु केल्या जाणार आहेत. कात्रज शाखेच्या उद्घाटनाबरोबरच तेथील एटीएमचेही उद्घाटन ना. गिरीश बापट यांनी केले.

उद्घाटन समारंभासाठी पुण्याचे महापौर श्री. दत्तात्रय धनकवडे, आयुक्त श्री. कुणाल कुमार, स्थायी समिती अध्यक्षा सौ. अश्विनी कदम, स्थानिक नगरसेविका सौ. अस्मिता शिंदे, सौ. वर्षा तापकीर, मनसेचे गटनेते श्री. वसंत मोरे, प्रकाशशेठ कदम, बँकेचे आजी-माजी संचालक तसेच सभासद, खातेदार मा. सर्वश्री प्रकाश गोरे, रसिकशेठ नहार, कपिल देशपांडे, प्रकाश कदम, राजाभाऊ कदम, पोपटशेठ ओस्तवाल, जगन्नाथराव झेंडे व सुनीलभाऊ शेळके आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी बँकेचे उपाध्यक्ष श्री. संजय लेले व संचालक श्री. बिरु खोमणे यांनी मान्यवरांचा यथोचित सत्कार केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंत कुलकर्णी यांनी केले तर कात्रज शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. श्रीनिवास खाडीलकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# ६६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील सत्कारार्थी



मा. श्री. दशरथ श्रीरंग माने उर्फ दादा माने
हस्ते मा. श्री. अरविंद खळदकर साहेब



मा. श्री. गुंडप्पा लक्ष्मण माने उर्फ अण्णा माने
हस्ते मा. श्री. संजय लेले साहेब



मा. सौ. हसीना रियाज इनामदार
हस्ते मा. सौ. मधुरा कसबेकर



मा. श्री. सलीम फरजान शेख यांच्या वतीने
श्री. जब्बार सलीम शेख
हस्ते मा. श्री. अतुल बेडेकर साहेब



मा. श्री. दीपक किर्तीलाल शहा
हस्ते मा. श्री. वसंतराव कुलकर्णी साहेब



मा. श्रीमती सुनीता अशोक पाटसकर
हस्ते मा. श्री. बिरू खोमणे साहेब



मा. सौ. राजश्री दत्तात्रय नागणे
हस्ते मा. श्री. सुनिल मुतालिक साहेब



मा. श्री. विद्याधर गजानन मोटे
हस्ते मा. श्री. लक्ष्मण पवार साहेब



मा. श्री. माधव नरहर केळकर
हस्ते मा. श्री. अरविंद खळदकर साहेब



मा. श्री. सुधीर महादेव गोखले
हस्ते मा. श्री. किशोरभाई शहा साहेब



मा. डॉ. श्री. संजीव डोळे
हस्ते मा. श्री. विजय भावे साहेब

## माहे मे ते जुलै २०१५ या कालावधीत सेवानिवृत्त झालेले सेवक

| | | |
|---|---|---|
| श्री. जयराम वि. आठल्ये | – रत्नागिरी | कनिष्ठ अधिकारी |
| श्री. नरसिंह नि. कोठावळे | – फर्ग्युसन कॉलेज रोड | लेखनिक |
| श्री. यतीन ना. तांबोळी | – सिंहगड रोड | लेखनिक |
| श्री. प्रकाश शं. पटवर्धन | – सहकारनगर | लेखनिक |
| श्री. नानाजी मां. पगार | – पिंपरी | लेखनिक |
| श्री. मिलिंद वा. गोखले | – विलेपार्ले | लेखनिक |
| श्री. रत्नाकर रा. धायगुडे | – मार्केट यार्ड | लेखनिक |
| श्री. जयंत प्र. गोरे | – दादर | लेखनिक |
| श्री. संजय श्रीराम दामले | – सीबीओसी विभाग | लेखनिक |
| श्री. नंदकुमार वि. लब्धे | – फोर्ट | शिपाई |
| श्री. गणपती म. कुंभार | – इंदापूर | शिपाई |
| श्री. बाळकृष्ण ब. खळदकर | – कर्ज विभाग | शिपाई |

# शनिवार नारायण पेठ शाखेच्या–सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित नेत्र तपासणी शिबिरास ग्राहकांचा भरभरून प्रतिसाद!

आपल्या बँकेच्या शनिवार- नारायण पेठ शाखेने आपल्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त दि. ९ जुलै २०१५ रोजी सर्व खातेदारांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिर आयोजित केले होते. या शिबिरास खातेदारांनी भरभरून प्रतिसाद दिला व कृतज्ञता व्यक्त केली.




मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन शनिवार- नारायण पेठ शाखा व अथर्व नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन प्रसिद्ध उद्योगपती व चार्टर्ड अकौंटंट श्री. शरद बाळ व उद्योजिका सौ. वृंदा बाळ तसेच कन्स्ट्रक्शन व्यावसायिक श्री. राज अगरवाल यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने सकाळी उद्घाटन कार्यक्रमाला बँकेच्या संचालिका डॉ. सौ. मधुरा कसबेकर, सह महाव्यवस्थापक श्री. दिलीप कुलकर्णी तसेच अथर्व नेत्रालयाचे डॉ. परीक्षित गोगटे, डॉ. संदीप डोळे हे उपस्थित होते. या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना उद्योजिका सौ. वृंदा बाळ म्हणाल्या, ''सध्याच्या काळात अन्य बँकांच्या व्यावसायिक दृष्टिकोनापुढे घरगुती वातावरण व सहकार्याचा अनुभव फक्त जनता बँकेतच येतो. खातेदारांशी या प्रकारच्या सामाजिक उपक्रमातून संबंध प्रस्थापित करणे कौतुकास्पद आहे.''

शिबिराला बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंतराव कुलकर्णी यांनी भेट दिली.

---

# रांजणगाव, ता. शिरूर येथे 'ऑफ साइट एटीएम'चे उद्घाटन संपन्न

घोडनदी शाखेच्या 'ऑफ साइट एटीएम'चे उद्घाटन श्री. मकरंद राधारमण देव (महाराज), मुख्य विश्वस्त, गणपती देवस्थान ट्रस्ट यांच्या शुभहस्ते दि. ५ जून २०१५ रोजी सकाळी १०.०० वाजता श्री क्षेत्र रांजणगाव येथे संपन्न झाले. या प्रसंगी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष श्री. अंकुश लवांडे, बँकेचे अध्यक्ष मा. श्री. अरविंद खळदकर, उपाध्यक्ष मा. श्री. संजय लेले, संचालक मा. श्री. किशोरभाई शहा, मा. श्री. रामदास शिंदे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंत कुलकर्णी हे उपस्थित होते.



या कार्यक्रमासाठी बँकेचे सह महाव्यवस्थापक श्री. अभय बापट, उपमहाव्यवस्थापक श्री. जगदीश कश्यप, सहाय्यक महाव्यवस्थापक श्री. श्रीधर म्हसकर, नियोजन विभागाचे प्रमुख श्री. राधाकृष्ण लिमये त्याचप्रमाणे संगणक विभागातील अधिकारी उपस्थित होते.

'ऑफ साइट एटीएम'चे उद्घाटन झाल्यानंतर देवस्थानचे सभागृहात एक समारंभ आयोजित केला होता. त्यामध्ये उद्घाटक व संस्थांनचे प्रमुख विश्वस्त श्री. मकरंद राधारमण देव (महाराज) यांचा सत्कार बँकेचे अध्यक्ष श्री. खळदकर यांनी केला. संस्थांनचे अध्यक्ष श्री लवांडे यांचा सत्कार बँकेचे उपाध्यक्ष मा. श्री. संजय लेले यांनी केला.

'ऑफ साइट एटीएम'चे फर्निचर, लाईट, तसेच अन्य कामे करणारे कंत्राटदार श्री. राजेश गोवंडे, श्री. प्रकाश कामठे यांचा सत्कार उपाध्यक्ष श्री. संजय लेले व मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. वसंत कुलकर्णी यांनी केला.

घोडनदी शाखेच्या स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य श्री. शिरीषकुमार बरमेचा, श्री मामा धोंगडे, यांचा सत्कार बँकेचे अध्यक्ष श्री खळदकर व उपाध्यक्ष श्री. संजय लेले यांनी केला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नियोजन विभागाचे विभागप्रमुख श्री. राधाकृष्ण लिमये यांनी केले. या कार्यक्रमास बँकेचे सेवक संचालक श्री. मधुसूदन हर्डीकर, घोडनदी शाखेचे विधान सल्लागार श्री. पोटे, तसेच अनेक मान्यवर खातेदार या प्रसंगी उपस्थित होते.

बँकेच्या स्टाफ वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष, श्री. पराग ठाकूर, सरचिटणीस श्री. जगन्नाथ कुलकर्णी, श्री. भास्कर भेगडे, तसेच घोडनदी शाखेचे सर्व सेवक उपस्थित होते.

शाखेचे शाखाव्यवस्थापक श्री. विजय जोशी यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

## वाचकांना नम्र आवाहन

गरूड झेप मध्ये प्रकाशित करण्यासाठी शाखा, कर्मचारी, ग्राहक, बँक, बँकिंग यांचे विषयी उपयुक्त तसेच महत्त्वाची बातमी, माहिती, विशेष उपलब्धी, गौरव पुरस्कार छायाचित्रांसह ए फोर साईजच्या पांढऱ्या कागदावर सुवाच्य अक्षरात लिहून बंद पाकिटात खालील पत्त्यावर पाठवावा. **पत्ता : श्री. जयंत लोकरे, मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कार्यालय, पुणे., मो. क्र. : ९९७०८००३४८**

**गरुड झेपसाठीची माहिती, लेख, फोटो इ. ईमेलद्वाराही पाठविता येईल. ✻ ईमेल आयडी : hrd@janatabankpune.com**

गरुड झेप

गरूड झेप ही गृहपत्रिका केवळ खाजगी वितरणासाठी प्रकाशित केली आहे. यातील मते व्यक्तिगत असून बँक त्याचेशी सहमत असेलच असे नाही. गृहपत्रिकेसाठी लिखाण, सूचना इ. साठी मनुष्यबळ विकास विभाग, मुख्य कचेरी येथे संपर्क करावा.

दूरध्वनी : ०२०-२४४५०५४०, मो. नं. ९९७०८००३४८. संपादकीय समन्वय : भालचंद्र कुलकर्णी, जनसंपर्क अधिकारी (मोबा. : ९८२२८८२५०९)